<u>जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत –</u>
<u>अधिकारांचे विकेंद्रीकरण</u>

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः अर्थसं-२०२०/प्र.क्र. ७३ (भाग-१)/अर्थसंकल्प व लेखा, (e-१८९४६९१)
गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार संकुल इमारत, १० वा मजला, नवीन मंत्रालय,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक: ०२ नोव्हेंबर, २०२६

<u>वाचा: -</u>

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अर्थस-२०१६/प्र.क्र. १५८/ अर्थसंकल्प, दि. २८ सप्टेंबर, २०१६
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र. ७३/अर्थसंकल्प, दि. ०९ नोव्हेंबर, २०२१ (सर्व जिल्हा शल्य चिकित्सक)
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र. ७३/अर्थसंकल्प, दि. ०९ नोव्हेंबर, २०२१ (सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी)
४) नियोजन विभाग, पत्र क्र. डीएपी-१०२६/प्र.क्र. २५८/का-जि.नि.स.१, दि. ०८ ऑक्टोबर, २०२६ (दि.३०.०९.२०२६ रोजीचे इतिवृत्त)

<u>शासन शुध्दीपत्रक –</u>

उपरोक्त वाचा क्र.४ येथील पत्रासोबतच्या दि.३०.०९.२०२६ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार, *"जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण / अनुसूचित जाती घटक कार्यक्रम /आदिवासी घटक कार्यक्रम) अंतर्गत योजना /काम संदर्भात तांत्रिक मान्यता अधिकार विकेंद्रीकरण करण्याची कार्यवाही करावी. तांत्रिक मान्यतेबाबतची प्रमाणित कार्यपध्दती विहित करावी. तांत्रिक मान्यतेच्या आदेशात योजना/ कामे यातील घटकांची, घटकनिहाय माहिती अंतर्भूत असावी."* असे निर्देश दिलेले आहेत. या निर्देशानुसार उपरोक्त वाचा क्र.२ व क्र.३ येथील शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

अ) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र. ७३/अर्थसंकल्प दि. ०९ नोव्हेंबर, २०२१ (सर्व जिल्हा शल्य चिकित्सक) सोबतच्या परिशिष्ट अ (१) - रुग्णालयासाठी औषधे, साहित्य व साधनसामुग्री खरेदी करणे यामधील अ.क्र. ११ च्या खाली ११ (अ) नव्याने समाविष्ट करण्यात येत असून तो खालीलप्रमाणे आहे.

"११ (अ) - आवश्यक औषधे यादी (EDL) मधील औषधी खरेदी करण्याचे तांत्रिक मान्यतेचे अधिकार जिल्हा शल्यचिकित्सक यांना प्रदान करण्यात येत असून वित्तीय मर्यादा रु.०१.०० कोटी (अक्षरी रुपये एक कोटी) वार्षिक अशी राहील. सदर खरेदी प्रचलित नियम व कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी."

ब) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र. ७३/अर्थसंकल्प दि. ०९ नोव्हेंबर, २०२१ (सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी) सोबतच्या परिशिष्ट अ (१) - प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्रासाठी औषधे, साहित्य व साधनसामुग्री खरेदी करणे यामधील अ.क्र. ११ च्या खाली ११ (अ) नव्याने समाविष्ट करण्यात येत असून तो खालीलप्रमाणे आहे.

"११ (अ) - आवश्यक औषधे यादी (EDL) मधील औषधी खरेदी करण्याचे तांत्रिक मान्यतेचे अधिकार जिल्हा आरोग्य अधिकारी यांना प्रदान करण्यात येत असून वित्तीय मर्यादा रु.०१.०० कोटी (अक्षरी रुपये एक कोटी) वार्षिक अशी राहील. सदर खरेदी प्रचलित नियम व कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी."

२. उक्त शासन निर्णयातील अन्य बाबी आहे तशाच लागू राहतील.

३. सदर शासन शुध्दीपत्रक उपरोक्त वाचा क्र.४ सोबतच्या दि.३०.०९.२०२६ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तातील अ.क्र.२ येथील निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत असून, सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६११०२१२२४०१७४१७ असा आहे. हे शासन शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VAIBHAV GAJANAN KOSHTI

Digitally signed by VAIBHAV GAJANAN KOSHTI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=5749DF8E46703E97E25555AFE696D0A51BADFA2373CCDC83593E18AF18E92F1A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=47C0ABB5437C6B09C621CCA6C499475684F37EA0F5529DD3EF3D6E6B3326E747, cn=VAIBHAV GAJANAN KOSHTI
Date: 2026.11.02 19:00:50 +05'30'

(वैभव ग. कोष्टी)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई (पत्राने)
२. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधान परिषद
७. मा. मुख्य मंत्री यांचे अपर मुख्य सचिव
८. मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य)/ मा.राज्य मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव
९. सर्व मा. मंत्री / मा. राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

११. अपर मुख्य सचिव (नियोजन), महाराष्ट्र शासन.
१२. अपर मुख्य सचिव (वित्त), महाराष्ट्र शासन.सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, महाराष्ट्र शासन.
१३. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन, मुंबई.
१४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन, मुंबई.
१५. सर्व सह सचिव/ उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. संचालक (रुग्णालय/प्राथमिक), आरोग्य सेवा, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई/पुणे.
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १ / २, मुंबई / नागपूर.
१८. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १ / २, मुंबई / नागपूर.
१९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२१. सर्व अवर सचिव/ कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. सर्व जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
२३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परीषदा.
२४. सर्व कार्यक्रम प्रमुख, आरोग्य सेवा,(आयुक्त यांचेमार्फत)
२५. सर्व जिल्हा शल्य चिकीत्सक, आरोग्य सेवा ,(आयुक्त यांचेमार्फत).
२६. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवा ,(आयुक्त यांचेमार्फत).
२७. सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा ,(आयुक्त यांचेमार्फत).
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२९. निवडनस्ती (अर्थसंकल्प व लेखा).